Im - 5333
06/05/2025

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

DGP-D ३ A/०११९/४/२०२५

मुंबई, ई स्वाक्षरीत तमूद

| |
|---|
| पो.अ. |
| अति.पो.अ. |
| सा.पो.अ.(मु) |
| |
| का.अ. |
| प्र.लि. |
| लिपिक क्रमांक |

**विषय :-** सन २०१४ मध्ये आयोजित केलेल्या राखीव पोलीस उप निरीक्षक पदाच्या अर्हता परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या पोलीस अंमलदार यांची ज्येष्ठता यादी.

******

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयामार्फत राखीव पोलीस उप निरीक्षक पदी पदोन्नतीकरिता आवश्यक असलेली अर्हता परीक्षा सन २०१४ मध्ये आयोजित करण्यात आली होती. सदर परीक्षेमध्ये एकूण 29[illegible] उमेदवार उत्तीर्ण झाले होते. त्याअनुषंगाने अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाने एकत्रितपणे परिक्षेत्रनिहाय अंतिम निकाल जाहीर केला होता.

2. सदर निकालाच्या अनुषंगाने उत्तीर्ण उमेदवारांची त्यांच्या पोलीस दलात भरती दिनांकानुसार या कार्यालयाकडून ज्येष्ठता यादी तयार करण्यात आली होती. सदर परीक्षेच्या अनुषंगाने मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांनी वेळोवेळी दिलेले आदेश / न्यायनिर्णयांच्या अनुषंगाने सदर ज्येष्ठता यादीमध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आली होती. सदर ज्येष्ठता यादीच्या आधारे संबंधीत पोलीस अंमलदार यांना सन 2014 पासून टप्प्याटप्प्याने या कार्यालयाकडून राखीव पोलीस उप निरीक्षक पदी पदोन्नती देण्यात आली आहे. सदरची ज्येष्ठता यादी सन २०२४ मध्ये संपुष्टात आलेली आहे. सदर ज्येष्ठता यादीमधील काही पोलीस अंमलदार यांना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि २५/०५/२००४ मधील तरतुदीनुसार राखीव पोलीस उप निरीक्षक या पदावर आरक्षणाचा लाभ देवून पदोन्नती देण्यात आली आहे.

३. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी-२०१८/ प्र.क्र. ३६६/ १६-ब दि.०७/०५/२०२१ अन्वये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. २७९७/२०१५ या प्रकरणी दि. ०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा. सर्वोच्च न्यायालयाने मा. उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.२५/०५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेने भरण्यात यावीत, अशा सूचना शासनाने निर्गमित केल्या आहेत.

४. त्यामुळे, सन २०१४ च्या विभागीय अर्हता परीक्षेमधील उत्तीर्ण झालेले व राखीव पोलीस निरीक्षक या पदावरील पदोन्नतीच्या विचार कक्षेत असलेले काही राखीव पोलीस उप निरीक्षक यांची निवेदने या कार्यालयास प्राप्त होत आहेत. त्यामुळे, सन २०१४ च्या विभागीय अर्हता परीक्षेमध्ये उत्तीर्ण पोलीस

अंमलदाराची पोलीस दलात भरती दिनांकानुसार लावण्यात आलेली ज्येष्ठता यादी (जशी आहे तशी) माहितीस्तव महाराष्ट्र पोलीस दलाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

५. तरी, संबंधीत घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, सदरची प्रत महाराष्ट्र पोलीस दलाच्या संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घेऊन ती त्यांच्या आस्थानेवरील सर्व संबंधित राखीव पोलीस निरीक्षक व राखीव पोलीस उप निरीक्षक यांच्या निदर्शनास आणुन द्यावी.

मा. अपर पोलीस महासंचालक (आस्थापना) यांचे मान्यतेने.

Signed by
Arvind Pandurang Andhere
Date: 30-04-2025 12:50:11

( अरविंद अंधेरे )
पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ उपसहायक (आस्था-१) (अति.का.)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकरिता.

**प्रति,**

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह )
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह)
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्गसह)
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्रे / गुन्हे प्रकटीकरण विद्यालय, नाशिक

**प्रत,**

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
पोलीस उप अधीक्षक, संगणक विभाग, पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२/- पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष यांनी सदरची ज्येष्ठता यादी कृपया www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर **राखीव पोलीस उप निरीक्षक विभागीय अर्हता परीक्षा सन २०१४ ज्येष्ठता यादी** या शिर्षाखाली एक महिन्यासाठी प्रसिध्द करावी.

---

जा.क्र.आस्था-७/२०१४/रापोउपनि/परीक्षा/उत्तीर्ण/पो.अंमलदार/२०२५ नांदेड दि.०८.०५.२०२५

२/- उक्त नमुद प्रमाणे माहीती व योग्य त्या कार्यवाहीस्तव .

**(एस.के.घोडजकर)**
कार्यालय अधीक्षक
पोलीस अधीक्षक, नांदेड करीता

**प्रती,**

राखीव पोलीस निरीक्षक,पो.मु.नांदेड

**प्रत** - सर्व संबंधीतांना

**प्रत :-** पोलीस लेखापाल, वेतन लिपीक, रजा लिपीक, आस्था-२ पव्यशा-२,जिपोप,पेन्शन लिपीक, पो.अ.कार्यालय, नांदेड.